# पंचायत राज व्यवस्था आणि ग्रामीण विकास (गडचिरोली जिल्हयाच्या विशेष संदर्भात.)

**प्रा. डॉ. गणेश बी. खुणे, महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी. ता. चामोर्शी, जि.गडचिरोली. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.** email-gkhune@rediffmail.com.

---

**गोषवारा-**

भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाची खरी सुरुवात 1992-93 ला 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने झाली व ही संविधान दुरुस्ती निश्चितच ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. पंचायत व्यवस्थेच्या निर्मितीने खऱ्या अर्थाने खेड्यांचा देश असलेल्या भारत देशात ग्रामीण विकासाला चालना मिळाली. गावातील अनेक विकास कामांची माहिती गावातील लोकांनाच असल्याने त्यांच्या राजकीय सहभागाने स्थानिक लोकांच्या हातातून या विकास कामांचे पूर्णत्व विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरले. "लोकशाही शासनव्यवस्थेत स्थानिक स्वशासन याचे महत्त्व अनेक दृष्टीने आहे. उदाहरणात या संस्था नागरिकांना राज्यकारभार चालविण्याचे शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या पाठशाळा असतात. त्या स्थानिक नेतृत्वाचा विकास घडवून आणतात. याशिवाय आदर्श नागरिक घडवण्याच्या प्रक्रियेत त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. म्हणून लार्ड राईस ने म्हटले आहे की, लोकशाहीची पाठशाळा आणि तिच्या यशाची काही ही स्थानिक प्रशासनाच्या व्यवस्थित असते.गावात असणाऱ्या अनेक विकासात्मक समस्या यामुळे मार्गी लागल्या."[1] सोबतच आरक्षणामुळे अनेक वर्षापासून सत्तेच्या प्रवाहापासून दूर असणारा उपेक्षित, पीडित, वंचित घटक सत्तेच्या प्रवाहात सामील होतांना दिसून येत आहे. एवढेच नाही तर अनेक प्रकारचे पदे यांना प्राप्त होऊन अनेक घरातील लोक अनेक प्रकारच्या राजकीय पदावरील कर्तृत्वामुळे प्रकाशझोतात आले. राजकीय सहभागासोबतच राजकीय पदे सांभाळण्याची संधी आल्याने त्यांच्या राजकीय सहभागात प्रगल्भता निर्माण झाली. पंचायत व्यवस्थेने अनेक विकास कामांना गती प्राप्त झाली आहे. गावातील अनेक स्थानिक समस्या मार्गी लागल्या असून स्थानिकांच्या हातात स्थानिक प्रशासनाच्या चाब्या दिल्याने स्थानिक नेतृत्व विकासाला चालना मिळाली. एकूणच पंचायतराज व्यवस्था आपल्या कार्यात सफल झाल्याचे दिसून येते.

बीज संज्ञा-

गडचिरोली जिल्हा, पंचायत राज, ग्रामीण विकास, महिला आरक्षण, राजकीय सहभाग.

प्रस्तावना-

भारत हा खेड्यांचा देश आहे. आपल्या देशात 70 टक्के जनता अजूनही खेड्यापाड्यात वास्तव्यात असते. पूर्वी खेडीही स्वयंपूर्ण होती. गावातील प्रत्येक गरजा गावातच पूर्ण होत होत्या. दुसऱ्या गावातील नागरिकांचा अत्यल्प संपर्क यायचा. सोबतच गावातील तंटे-भांडणे गावातच मिटविले जात. प्रत्येक गावात विविध जाती-धर्माचे लोक राहात असले तरी प्रत्येक जातीमध्ये एक पंचायत होती व ती पंचायत भांडण व तंट्याचे उच्चाटन करीत होती. गाव हे पूर्णता स्वयंपूर्ण स्वरूपाचे होते. गावातील काही श्रेष्ठजन मंडळी गावात शांतता व सुव्यवस्था नांदण्याकरिता प्रयत्नशील असायचे. गावातील कारभार निश्चीतच सुसूत्रतेने चालायचा. " गावातील हुशार, अनुभवी, आदरणीय अशी पंचमंडळी असायची. गावातील चावडी सारख्या सार्वजनिक ठिकाणी रोज सकाळी ही मंडळी

बसायची आणि गावातील लोकांच्या अडचणी समजावून घेऊन मार्गदर्शन करावयाची. गावामध्ये काही वाद, भांडणे झाल्यास त्यामध्ये लक्ष घालून सोडविणे, गावचा विकास होण्यासाठी योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करून राजाला खंड वसूली देणे इ. कामे ही पंचमंडळी पार पाडीत असत. गावात त्यांना फार मान होता. गावकरी त्यांच्या शब्दाबाहेर जात नसत. ."[2]

परंतु इंग्रजांच्या आगमनानंतर या व्यवस्था मोडकळीस आल्या. व खेड्यांची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल लयास गेली. ब्रिटिशांनी या व्यवस्था मोडण्याकरिता स्वतचा एकछत्री अंमल निर्माण केला. परंतु स्वतंत्र भारतात मात्र या व्यवस्था उभारणीसाठी प्रयत्न झालेत व अनुच्छेद 40 मध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्याची जबाबदारी राज्यांवर सोपविण्यात आली आणि 1992-93 ला 73 व 74 वी घटनादुरुस्ती करण्यात येऊन पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक स्थान देण्यात आले. आणि गावच्या विकासाची जबाबदारी ग्रामपंचायतीला देऊन, स्थानिक नेतृत्व बळकट करण्यासाठी प्रयत्न झालेत. गावातील समस्यांची जाणीव स्थानिकांना अधिक असल्याने स्थानिकांच्या हातात सत्तासूत्रे ही व्यवस्था सोपवते. त्यामुळे स्थानिकांचा राजकीय सहभाग व स्थानिक नेतृत्वाच्या जडणघडणीत व जबाबदारीत वाढ होताना दिसते. अशाप्रकारे पंचायतराज व्यवस्थांना संविधानात्मक स्थान देऊन पंचायत राज व्यवस्थेच्या हातात गावातील विकासाची जबाबदारी सोपवली गेली. गडचिरोली जिल्हा हा अतिमागास असून या जिल्हयात आदिवासी जमात बाहुल्यास्थितीत असून हा जिल्हा वनाच्छादित, दुर्गम, डोंगराळ, विरळ लोकवस्तीचा आहे. या जिल्हयात पंचायतराज व्यवस्थेची ग्रामीण विकासातील नेमकी स्थिती काय आहे. पंचायत राज व्यवस्थेमुळे ग्रामीण विकासात कितपत भर पडली. नागरिकांच्या समस्या कितपत संपल्यात व गावातील विकासाची दिशा नेमकी काय आहे. या व अशा अनेक स्थानिक बाबींचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याकरिता पंचायतराज व्यवस्थेची ग्रामीण विकासातील नेमकी स्थिती काय? याचा अभ्यास सदर संशोधन लेखांमध्ये करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संशोधन क्षेत्र-

संशोधन क्षेत्र हे संपूर्ण गडचिरोली जिल्हा असून या जिल्हयात आदिवासी जमात बाहुल्यास्थितीत असून हा जिल्हा वनाच्छादित, दुर्गम, डोंगराळ, विरळ लोकवस्तीचा आहे. या जिल्हयात पंचायतराज व्यवस्थेची ग्रामीण विकासातील नेमकी स्थिती काय आहे. याचा अभ्यास सदर संशोधन लेखांमध्ये करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

नमुना निवड-

गडचिरोली जिल्हा आकाराच्या दृष्टीने विस्तृत असल्याने या जिल्हयातून 200 उत्तरदाते नमुना म्हणून निवडण्यात आले आहेत. ही निवड सोयीस्कर यादृच्छिक नमुना निवड पद्धतीद्वारे करण्यात आली आहे. यामुळे प्रत्येक एककाशी संपर्क साधने सहज शक्य होईल. यामध्ये 200 उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली.

संशोधनाचे महत्त्व –

प्राचीन काळात स्वयंपूर्ण असणारे खेडी व पंचायत राज व्यवस्था ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्ताराच्या विस्तारामुळे लयास गेलीत. गावातील वाद-विवाद पंचांच्या सल्ल्याने मिटविण्याची व्यवस्था ही प्राचीन भारतातील न्याय व्यवस्थेचे योग्य उदाहरण होते. अनेक वाद विवादात्मक बाबींचे निराकरण करण्यासाठी ची योग्य व्यवस्था तत्कालीन काळात उपलब्ध केली गेली होती. परंतु ब्रिटिशांच्या काळात ती व्यवस्था लयास गेली. मात्र स्वतंत्र भारतात या व्यवस्थेची अनिवार्यता लक्षात घेऊन त्या स्थापनेची संपूर्ण जबाबदारी ही राज्यांवर सोपविण्यात आली. पण राज्यांनी त्यात पाहिजे त्या प्रमाणात लक्ष न पुरवल्याने 1992-93 ला 73 व 74 वी संविधान दुरुस्ती करून या व्यवस्थाना संविधानात्मक स्थान दिले गेले व संपूर्ण भारतभर स्थानिक विकासाच्या चाव्या स्थानिकांच्या हातात दिल्या गेल्यात. भारतात ग्रामीण विकासाला नवी दिशा देणारी व्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे ज्या उद्‌देशाने या व्यवस्था निर्माण केली गेली त्या व्यवस्था आपल्या उद्‌देशात सफल झाले किंवा नाही. ग्रामीण विकासाची जबाबदारी स्थानिक लोकांच्या हातात सोपवली असल्याने जनता कितपत राजकीय सक्रिय होऊ शकली व त्याने ग्रामीण विकासात कितपत भर पडली. अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी व महिलांसाठी ही संविधान दुरुस्ती महत्त्वपूर्ण असून या प्रवर्गाची सध्याची स्थिती काय व ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण बदल घडविण्याच्या म्हणजेच ग्रामीण विकास करण्यासाठी जे अधिकार बहाल केले गेले त्यात ग्रामीण विकासाची आजची वस्तुस्थिती काय? या व अशा अनेक कारणांचा शोध या संशोधन पत्रातून केल्या गेला आहे.

संशोधनाचा उद्‌देश -

1) पंचायत राज व्यवस्थेच्या कार्याचे परीक्षण करणे.
2) स्थानिकांचा राजकीय सहभाग तपासणे.
3) गावच्या विकासाची स्थिती तपासणे.
4) गावातील समस्यांचे कितपत निराकरण झाले किंवा नाही याचा शोध घेणे.
5) ग्रामस्थांना आरक्षणाचा फायदा झाला किंवा नाही याचा शोध घेणे.

संशोधनाची गृहितके-

1) गावातील विकासात्मक समस्या दूर झाल्यात.
2) नागरिकांचा राजकीय सहभाग वाढला.
3) पंचायतराज व्यवस्था आपल्या उद्‌देशात सफल झाली.
4) आरक्षणामुळे नागरिकांना अनेक राजकीय पदांची प्राप्ती होत आहे.

सारणी क्रमांक **- 1.**

पंचायती मुळे गावातील विकासाची स्थिती दर्शक सारणी

| **अ. क्र.** | **प्रतिसाद** | **वारंवारिता** | **प्रमाण (%)** |
|---|---|---|---|
| 01 | होय | 198 | 99 |
| 02 | नाही | 02 | 01 |
| | **एकूण** | **200** | **100** |

उपरोक्त सारणी पंचायत व्यवस्थेमुळे गावातील विकास झाला किंवा नाही यासंदर्भातील असून एकूण 200 उत्तरदात्यांपैकी 198 उत्तरदात्यांनी विकास झाला आहे असे सांगितले आहे. तर 02 उत्तरदाते नकारात्मक मत नोंदवितांना दिसतात.

यावरून असे स्पष्ट होते की, पंचायत राज व्यवस्थेची स्थापना जो उद्देश समोर ठेवून केली गेली होती त्यात पंचायत व्यवस्था यशस्वी होत असल्याचे दिसून येते. ग्रामीण विकासात पंचायत राज व्यवस्थेने आपली अमिट छाप निर्माण केली आहे.

सारणी क्रमांक - 2.

उत्तर होय असल्यास पंचायत राज व्यवस्थेने गावातील विकास दर्शक सारणी

| **अ. क्र.** | **प्रतिसाद** | **वारंवारिता** |
|---|---|---|
| 01 | रस्ते व नाल्या | 198 |
| 02 | स्वच्छता | 199 |
| 03 | शुद्ध पिण्याचे पाणी व आरोग्य | 195 |
| 04 | पथदिवे | 190 |
| 05 | चेतना व जागृती | 171 |
| 06 | राजकीय सहभाग | 198 |
| | **एकूण** | **1151** |

उपरोक्त सारणी वरून असे दिसून येते की, एकूण 200 उत्तरदात्यांपैकी 198 उत्तरदाते रस्ते व नाल्या, 199 उत्तरदाते स्वच्छता, 195 उत्तरदाते शुद्ध पिण्याचे पाणी व आरोग्य, 190 उत्तरदाते पथदिवे, 171 उत्तरदाते चेतना आणि जनजागृती, 198 उत्तरदात्यांनी राजकीय सहभाग याबाजूने मत नोंदवले.

यावरून असे स्पष्ट होते की, निश्चितच पंचायतराज व्यवस्था ज्या कामाकरिता निर्मिती केली गेली होती त्या कार्यात यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. वरील सारणीत गावातील प्राथमिक समस्या आहेत त्या पंचायतराज व्यवस्था यामुळे परिपूर्ण होताना दिसून येत आहेत. पंचायत व्यवस्था या गावातील विकासासंदर्भात निश्चितच सक्रिय असल्याचे दिसून येत आहे.

सारणी क्रमांक **- 3.**

आरक्षणाचा झालेला फायदा या संदर्भातील सारणी

| **अ. क्र.** | **प्रतिसाद** | **वारंवारिता** | **प्रमाण (%)** |
|---|---|---|---|
| 01 | होय | 200 | 100 |
| 02 | नाही | 00 | 00 |
| | **एकूण** | **200** | **100** |

उपरोक्त सारणी पंचायत राज व्यवस्थे प्राप्त झालेल्या आरक्षणासंदर्भातील असून एकूण उत्तरदात्यांपैकी सर्वच उत्तरदात्यांनी आरक्षणाचा फायदा झाला असे सांगितले. एकूणच पंचायत राज व्यवस्थेने अनुसूचित जाती जमाती, ओबीसी व महिलांसाठी जी आरक्षणाची व्यवस्था केली त्या आरक्षणाचा फायदा सर्वच गटातील लोकांना होतांना दिसून येत आहे. समाजामध्ये असणारे वंचित, दुर्लक्षित घटक आरक्षणाने प्रवाहात आले व समाजातील सर्वच घटकांचा राजकीय सहभाग वाढण्यास मदत झाली.

संशोधनाचे निष्कर्ष -

1) पंचायत राज व्यवस्थेने केंद्र व राज्य सरकारांवर भार कमी करण्यासाठी विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाचा पुरस्कार करून पंचायत पंचायत राज व्यवस्थेची निर्मिती ज्या कामाकरिता केली, त्यात ते सफल झाले आहे. ग्रामीण स्तरावरील ज्या समस्या होत्या त्या समस्या दूर करण्यास पंचायती यशस्वी झाल्यात. पंचायती मुळे गावातील अनेक विकासात्मक समस्या मार्गी लागल्यात.

2) पंचायत व्यवस्थेने आरक्षणाची व्यवस्था केल्याने अनेक जाती, धर्माचे लोक राजकारणात सहभागी होऊ लागलेत. पूर्वी केवळ सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा प्राप्त लोक सहभागी व्हायचे. परंतु आरक्षणाने समाजातील सर्वच घटक सहभागी होऊ लागले. सोबतच प्रत्येक गावागावात पंचायत व्यवस्था निर्माण झाल्याने राजकारणापासून अलिप्त असणारा वर्ग सुद्धा राजकारणात सहभागी होऊ लागला व आपले मत नोंदवू लागला. आरक्षण व्यवस्थेने अनेक घटकांना केवळ संधी मिळाली नाही तर निवडून आल्यावर अनेक प्रकारचे राजकीय पदे प्राप्त झाली. आरक्षणाने अनेक घटकातील लोक सरपंच, उपसरपंच, सभापती, अध्यक्ष अशा अनेक पदापर्यंत पोहोचले जे पूर्वी अनेकांना शक्य नव्हते. परंतु आरक्षणाच्या फायद्याने अनेक महत्त्वाची राजकीय पदे पंचायत राज व्यवस्थेने अनेकांना प्राप्त झाली.

3) एकूणच जी अपेक्षा ठेवून पंचायती राज व्यवस्था निर्माण करण्यात आली किंवा घटनात्मक स्थान दिले गेले व जी अपेक्षा व्यक्त केल्या गेली त्यात पंचायत राज व्यवस्था यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे. "गावा गावांमधील स्थानिक स्वशासन संस्था या लोकशाही शासन व्यवस्थेच्या खऱ्या आधारस्तंभ आहेत त्यांच्या अस्तित्वामुळेच लोकशाही शासन व्यवस्था ही अधिक प्रभावी आणि यशस्वी होत आहे."[3] ग्रामीण विकास आणि ग्रामीण लोकांचा राजकीय सहभाग असो वा आरक्षणाने मिळालेली राजकीय पदे असोत सर्वच बाबतीत पंचायत व्यवस्था कसोटीवर खरी उतरली असल्याचे दिसून येत आहे.

संदर्भ -

1) रा. ज. लोटे, भारतातील स्थानिक स्वशासन, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर -2014, पृष्ठ क्रमांक -62.

2) विकास पेडीया, पंचायती राज व्यवस्थेचा पूर्व इतिहास.

3) रा. ज. लोटे, भारतातील स्थानिक स्वशासन, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर -2014, पृष्ठ क्रमांक -29.